Vol 4 Issue 1 Feb 2014
Impact Factor : 2.1506(UIF)
ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 2.1506(UIF)**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-1 | Feb-2014
Available online at www.isrj.net

# 1920 ते 1947 या कालखंडातील समाज परिवर्तन आणि मराठी साहित्य

***रावसाहेब दशरथ ननावरे***

ॲड्.एम.एन.देशमुख महाविद्यालय, राजूर, ता.अकोले, जि.अहमदनगर

***सारांश :- परिवर्तनाची संकल्पना :***

परिवर्तन या शब्दाचा शब्दशः अर्थ बदल असा होतो. परिवर्तन ही सृष्टीचा नियम आहे.सृष्टीतील मानव हा महत्त्वाचा घटक आहे. मानवी जीवन व्यवहार निसर्गातील घटनांवर आधारीत असतो. मानवी जीवन हा साहित्याचा महत्त्वपूर्ण विषय आहे.मानव जीवन हे स्थीर नसून ते परिवर्तनशील आहे. मानवी समूहातुन समाज या घटकांची निर्मीती झालेली आहे. सामाजिक स्थिती ही सार्वत्रिक सार्वकालिक स्थिर असत नाही तर तिच्यात बदल होत असतो. समाजातील बदल हा परिवर्तनाचा सूचक आहे. परिवर्तन हे सुद्धा लवचिक असते. परिवर्तन हे फक्त बाहय जगाशी संबंधित आहे. सर्वसामान्यपणे डॉ.रावसाहेब कसबे हे परिवर्तनाची व्याख्या पुढीलप्रमाणे करतात,

### *प्रस्तावना :*

"व्यक्ती किंवा वस्तूत जे आतून(पजीद) आणि परस्परांमध्ये कालबाधित(Temporal) घडणा–या फरकांचा क्रम होय".[1] व्यक्तीसमुहातून समाज या घटकाची निर्मिती झालेली आहे. परिवर्तनात अंतर्गत परिवर्तन हे काळाशी सुसंगत असल्याचे डॉ.रावसाहेब कसबे व्याख्येतुन दिसते. ॲंथनी स्मिथ यांनी परिवर्तनची पुढील प्रमाणे व्याख्या केलेली आहे.''वेळोवेळी विशिष्ट घटकात किंवा संरचना सुधारणा करणा–या किंवा त्या जागी पूर्ण नव्या घटकांची किंवा संरचनेची निर्मिती करणा–या घटनांचा क्रम म्हणजे परिवर्तन होय ".[2] घटना केंद्रीभूत मानणा–या स्मिथ यांची व्याख्या सामाजिक परिवर्तनाच्या आकलनास पूरक वाटते.

परिवर्तन म्हणजे व्यक्तीच्या सामाजिक आर्थिक सांस्कृतिक संरचनेत कालनिष्ठ होत जाणारा बदल होय. हा बदल विशिष्ट काळातील घटनांमुळे होत असतो. ह्या घटना निसर्गासोबत व्यक्ती व व्यक्तीसमुह म्हणजे समाजामुळे होतो. समाजाचा संक्रमणकाळच परिवर्तनाचे सूचन करतो असे म्हणता येईल.

### *1920–1947 या कालखंडातील समाज परिवर्तन (स्वातंत्र्यपूर्व कालखंड)*

1920 पूर्वीचा कालखंड हा सामाजिक व राजकीय परिवर्तनाची विशेष नोंद घेणारा कालखंड आहे. भारतात इंग्रजांची अंमदानीत मवाळ व जहाल असे दोन पक्ष होते. टिळकांनी आपली आक्रमक अशा राष्ट्रीय कार्यातून महाराष्ट्रात स्वातंत्र्याविषयी जागृती केली.टिळकांच्या निधनानंतर गांधींयुगाचा प्रारंभ झालेला दिसतो. गांधी युगात गांधीवादी तत्त्वज्ञान प्रभाव महाराष्ट्रावर पडत होता.गांधीजींच्या चळवळीतून संपूर्ण देश स्वातंत्र्यआंदोलनात सक्रीय होत होता. 1942 ची चळवळीतून स्वातंत्र्याची चळवळ अधिक तीव्र झाली.याच सुमारास दुस–या महायुध्दाने सर्व जगाला ग्रासले. महागाई, वस्तूची टंचाई,रेशनचा संप यांमुळे सर्व वातावरण भारावून गेले. सुभाषबाबूंनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग अवलंबिला होता.

1920–40 याच कालखंडात माणसाचे जीवन यशवंत होऊन एकत्र कुटुंब व्यवस्था मोडकळीस आली.जुनी पिढी व नवी पिढी यांच्या वैचारिक संघर्ष निर्माण झाला. माणूसकीचा –हास व्हायला लागला. विषमता वाढली. या सर्वांमधून महाराष्ट्राचे सामाजिक वातावरण ढवळून निघाले. समाजाची मूल्ये बदलली. जुनी टाकाऊ मूल्याचा फेरविचार होउन नवीन मूल्य स्विकारली जाऊ लागली. या सर्व सामाजिक परिवर्तनाची नोंद मराठी साहित्याने घेतलेली दिसते. 1920ते1945 या कालखंडातील सामाजिक परिवर्तनाची प्रतिबिंब मराठी साहित्यात कथा, कादंबरी, कविता व नाटक या प्रकारातून उमटलेले दिसते.

### *1920–47 या कालखंडातील समाजपरिवर्तन आणि कथा*

दुस–या महायुध्दाचा विपरीत परिणाम समाजावर झालेले होते.माणसाला एक प्रकारे विफलता आलेली होती. मानवी जीवनमूल्यांची पडझड झालेली होती. अशा उद्ध्वस्त जीवनविश्वाचे व मानवतेचे विटंबन झालेल्या अवस्थेचे विदारक चित्रण अरविंद गोखले ,गंगाधर

गाडगीळ ,माडगुळकर या कथाकारांनी केले. अरविंद गोखले यांनी 'कोकराची कथा' (1945) ही वैशिष्टपुर्ण ठरली. दुसरे महायुध्द हे मराठी कथेला वळण देणारे ठरले. नव्या जाणिवा व नवी अनुभूती लघुकथेतून नवकथा निर्माण होणाला पोषक ठरली. आपटे यांनी सामाजिक जीवनातील ढोंग,स्वार्थ, विषमता यांचे निरीक्षण केले. युध्दकालीन जीवनाच्या वर्णनातुन 'काळाबाजार ' 'रॉकेल टंचाई,' 'साखरेचे वाण' या सारख्या कथांतुन सामाजिक बदलातुन आर्थिक परिवर्तनाची नोंद घेतली गेली.

या काळात सामाजिक परिवर्तनाची दखल स्त्री लेखिकांनी घेतलेली दिसते. विभावरी शिरुरकरांनी 'कळ्यांचे निश्वास' या कथासंग्रहात स्त्री जीवनाच्या समस्या,स्त्री–पुरूष समानतेमुळे स्त्री पुरूषाच्या वाढत्या परिचयामुळे स्त्री जीवनात निर्माण झालेल्या विविध प्रश्नांचे चित्रण 'प्रेम विष की अमृत' रिकाम्या भांडण्याचे विवाद 'प्रेम की पशुवृत्ती' 'बाबा माझा संसार कसा होईल ' या कथांमधुन केलेले आहे. विभावरी शिरुरकरांच्या कथालेखनाविषयी म.ना. अदावंत हे सूचक व नेमके भाष्य करतात " स्त्री मनाचे सखोल विश्लेषण, तिच्यापुढे पडलेल्या विविध सामाजिक समस्या व रुढीच्या आणि बदलत्या परिस्थितीच्या कात्रीत सापडल्यामुळे त्याच्या जीवनाची झालेली परवड या सर्वांचे चित्रण विभावरी शिरुरकरांनी या कथांतुन अतिशय जिव्हाळ्याने केले आहे." [3] विभावरी शिरुरकरांच्या समाजपरिवर्तनाच्या कसोटीस उतरणा–या आहेत.सौ.मुक्ताबाई दीक्षित यांनी 'अनिरूध्द प्रवाह''मानस लहरी' 'आमचं घर'या कथांमधून पुरुष हुकुमीपणास नकार देणारी मुलगी आणि समाज हक्कासाठी झालेला भ्रमनिरास यांचे चित्रण केले आहे..पुनर्विवाह,द्विपत्निकत्वासंबंधीचा मूलगामी विचार त्यांच्या कथेत येतो. एकून स्त्री लेखिकांनी बदलत्या समाज मूल्यांनी निर्माण झालेल्या स्त्री समस्यांचा वेध घेतलेला आहे.

### *1920–47 या कालखंडातील समाज परिवर्तन आणि कविता*

1940–45 या कालखंड गांधीवादामुळे प्रभावित झाला आहे.गांधीजीनी खेड्यापाड्यातून सभा,मोर्चे, चळवळी प्रभातफे–या या माध्यमातुन महाराष्ट्रात लोकजागृती केली.मराठी साहित्याची त्यास मदत झाली. 1942 च्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर कुसुमाग्रजांची 'गर्जा जयजयकार ',कुंजाविहारीनी 'भेटने नऊ महिन्यांनी 'अशा कविता निर्माण झाल्या. ग.दी.माडगुळकर, वसंत बापट, कवी यशवंत,साने गुरूजी यांच्या कविता स्वातंत्र्यमूल्य रूजविना–या स्वातंत्र्यगिते ठरल्या. 'सागरास,' 'माझे मृत्युपत्र,' 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' अशी गिते लिहून सावरकरांनी समाजात क्रांतीची व स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवली.

1920–1935 या कालखंडात क्रांतीच्या विचारासोबतच साम्यवाद व समाजवाद हा नवा विचार मूळ धरीत होता. रशियातील राजकीय व सामाजिक क्रांतीकडे मराठी कवीचे लक्ष गेले. कुसुमाग्रजांनी बळी,लिलाव, गुलाम, आगगाडी आणि जमीन या कवितांमधून समाजवादी व साम्यवादी विचार समाजात रूजविण्याचा प्रयत्न केला. दुस–या महायुध्दाच्या सामाजिक राजकीय बदलाची नोंद मर्ढेकरांनी 'शिशिरागम'(1939) या कवितासंग्रहात घेतलेली आहे. मानवांची आंतरराष्ट्रीय भूमिका 'निर्वासित चिनी मुलास' या खंड काव्यातून कवी अनिलांनी घेतली. समाज विचारांची मूल्ये मनमोहन नातू यांनी रुजविला. त्यांच्या 'उद्धार'(1933) या कवितेतून आंतरजातीय विवाहाचे वर्णन येते तर 'युगायुगाचे सहकारी' (1933) या काव्यातून हिंदू मुस्लीम ऐक्य रूजविन्याचा प्रयत्न करतात. या कालखंडातील कविता या साहित्यप्रकाराच्या समाजपरिवर्तनातील कार्याची प्रा.रा.श्री.जोग पुढीलप्रमाणे दखल घेऊन निरीक्षण नोंदवितात." स्वातंत्र्यपूर्व काळात परकिय राज्य, पारतंत्र्याचे दुःख स्वातंत्र्याची दुर्दम्य ईच्छा,ऐतिहासिक कालाबद्दलचे प्रेम वा आकर्षण या गोष्टी काव्यात प्रतिबिंबित होत होत्या. स्वातंत्र्याच्या आगमनाच्या वेळी त्याबद्दलचा आनंद व्यक्त झाल्यावर मात्र हे विषय कवितेच्या प्रांतात साहजिकच येईनासे झाले." [4] रा.श्री. जोगांनी कविता या वाङमय प्रकाराच्या कार्यासोबत खंतही व्यक्त केली आहे.

### *1920 ते 47 या कालखंडातील समाजपरिवर्तन आणि कादंबरी*

1920 ते 1945 या कालखंडात इंग्रजी राजवटी सोबत राजकीय संघर्ष तीव्र होत होता. टिळक युगानंतर गांधी युगास प्रारंभ झाला. पहिल्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या अर्थसंबंधातून नवे ताणतणाव निर्माण होत होते.याच काळात श्री.वा.म.जोशी यांनी 'सुशिलेचा देव' या कादंबरीतुन एका जागृत स्त्रीचा आत्मविकास कसा झाला हे सांगताना मध्यमवर्गीय स्त्रीचा जगण्याचा सामाजिक संघर्षाचे चित्रण केले. ध्येय हेच देव मानून सुशिला विश्व कुटुंबवाद स्विकारते.गांधीवादाच्या प्रभावातुन कादंबरी या साहित्य प्रकाराने गति घेतलेली दिसते. इंदु काळे सरला भोळे(1935)या कादंबरीतील विनायक हा सत्याग्रही नायक आपले जीवन खेडेगावच्या सुधारणेसाठी वाहुन घेतो. वा.म.जोशी यांच्या कादंबरीची वैशिष्ट्ये डॉ. वंदना महाजन पुढीलप्रमाणे नोंदवितात " वामन मल्हारांनी मराठी कादंबरी वाङ्मयात पहिल्यांदाच ध्येयवादाने प्रेरित झालेल्या स्त्रियांचे वर्णन केले आणि मराठी कादंबरीला एक नवे अधिष्ठान प्राप्त करुन दिले." 5 स्त्री स्वातंत्र्य व स्त्री पुरुष समानता निर्माण करण्याच्याद्दष्टीने महत्त्वाचे ठरले. ना.सी.फडके यांच्या 'निरंजन' कादंबरीत सविनय कायदेभंगाच्या चळवळीचे चित्रण येते. वि.स.खांडेकरांच्या कादंबरीतही गांधीवादाचा प्रभाव स्पष्ट दिसतो. 'कांचनमृग'(1931)या कादंबरीतील नायक राष्ट्रसेवा करणारा सुधारक आहे. 'पांढरे ढग '(1939) मधील अभय सामाजिक विषमतेचे पुजन करणा–या समाजव्यवस्थेविरुध्द भाश्य करतो. डॉ.वसंत क्षीरे यांनी "वि.स. खांडेकरांच्या बहुतेक कादंब–यांतील पात्रे गांधीवादाशी संबंधित आहेत व ते गांधीवादाने भारलेले दिसतात."[6] हे विधान खांडेकरांची वैचारिक धारणा स्पष्ट करणारे वाटते.

1920ते1947 चा कालखंड समाजवाद व राष्ट्रवादाने प्रभावित असलेला कालखंड आहे. श्री.व्य.केतकरांनी 'ब्राम्हणकन्या '(1930) या कादंबरीत ब्राम्हणेत्तरापासुन झालेल्या मुलीच्या जीवनाकडे सर्व बाजूने आणि सारख्याच स्थितीने पाहतात तर गं.त्र्यं.माडखोलकर 'मुक्तात्मा' या कादंबरीत तत्कालीन राजकीय वाद प्रवादासोबत सामाजिक समस्यांचे दर्शन घडवितात. मामा वरेरकर 'विधवाकुमारी'(1928) या कादंबरीत एका भिक्षुक विधवा मुलीच्या कर्तृत्वाची कथा सांगतात. तर 'धावता धोटा '(1933) या कादंबरीत गिरणी कामगाराच्या संघर्षाची चित्रण करतात.

बा.सी.मर्ढेकरांची 'पाणी', 'तांबडी माती'(1943) या कादंब–या महायुध्दोत्तर कालखंडातील व्यक्तिंच्या ढासळत्या जीवननिष्ठांचा व व्यक्तीजीवनातील गुंतागुंतीचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतात. दुसरे महायुध्द ही या कालखंडातील महत्त्वाची घटना आहे.या पार्श्वभूमीवर

विश्राम बेडेकरांनी 'रणांगण' (1939) ही कादंबरी लिहीली. दुस–या महायुध्दातील मानवसंहारक विश्वयुध्दाच्या भीषणतेचा प्रत्यय देते.

स्त्री स्वातंत्र्याशी निगडीत असलेल्या वेगवेगळ्या समस्या गीता साने यांनी 'निखळलेली हिरकणी'(1936) 'लतिका'(1940) या कादंब–यामधुन मांडलेल्या आहेत. स्त्रीयांचे कौटुंबिक संबध, स्त्रीपुरुष संघर्ष,कुटुंबातील आर्थिक विषमता इत्यादी समस्या हातळलेल्या आहेत.

### *1920 ते 47 या कालखंडातील समाजपरिवर्तन आणि नाटक*

1920 ते 1947 या कालखंडातील नाटकावर साम्यवाद व स्वातंत्र्यापूर्वीच्या उंबरठयावरील सामाजिक राजकिय घडामोडीचे चित्रण केलेले आढळते. मामा वरेरकरांनी 'जीवाशिवाची भेट' या नाटकातुन ग्रामीण भांडवलदारांच्या नीच कारवायांचा कौशल्यपुर्ण आविष्कार केलेला आहे. आचार्य अत्रे यांनी 'उदयाचा संसार','घराबाहेर' या नाटकांमधुन सामाजिक प्रश्न मांडलेले आहेत. असहकार, अहिंसा, सत्याग्रह, मजूर चळवळ, पतितपरिवर्तन, स्त्रीस्वातंत्र्य, अस्पृश्यतानिवारण इत्यादी प्रश्नांतुन मामा वरेरकरांनी नाटयसृष्टी संपन्न केली.

स्त्रीयांच्या समस्या व स्त्रीयांचे प्रश्न या प्रेरणेतुन मो.ग.रांगणेकरांनी 'कुलवधू' (1942),'आशीर्वाद'(1941) ही नाटके लिहीली. 'आशीर्वाद' मधील गरीब बापाची मुलगी उच्च शिक्षण घेतल्यानंतर आपले कुटुंब पोसावे या इच्छेने बाप तिच्या लग्नाला विरोध करतो. 'नंदनवन' या नाटकात बेलगामी व्यसनी नव–याचा तिटकारा आल्यामुळे त्याला सोडुन दुस–या पुरुषासोबत संसार करुन घराचे नंदनवन बनवले पाहिजे अशा विचाराची धाडसी स्त्री चित्रित केलेली आहे. 'माझे घर '(1945) या नाटकात एकत्र कुटुंबातील व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न मांडतात.

### *निष्कर्ष*

1.1920 ते 1947 या कालखंडातील साहित्यास समाजपरिवर्तनास पोषक अशा विविध चळवळीची पाश्वभूमी आहे. असहकार आंदोलन सविनय कायदेभंग चलेजाव चळवळ इत्यादी.
2.मराठी साहित्याने गांधीवाद साम्यवाद समाजवाद राष्ट्रवाद या सर्व विचारातुन निर्माण झालेल्या समाजपरिवर्तनाची ठळक नोंद घेतलेली आहे.
3. या कालखंडातील मराठी साहित्यनिर्मितीस गांधीवाद राष्ट्रीय व स्वातंत्र्य चळवळी व्यक्ती स्वातंत्र्य इ.घटक पोषक ठरलेले आहेत.
4. या कालखंडातील बहुतांशी लेखक राष्ट्रीय व सामाजिक परिवर्तनाच्या उद्देशाने झपाटलेले होते.त्यामुळे वरील सर्व चळवळीचे दर्शन त्यांच्या साहित्यात घडताना दिसते.
5. या काळातील साहित्य स्वातंत्र्य चळवळ तीव्र व आक्रमक करण्यास कारणीभूत व उपयुक्त ठरलेले आहे.
6. स्त्री पुरुष समानता एकत्र कुटुंब पध्दती स्त्री शिक्षण या प्रश्नांची मीमांसा कथा आणि कादंबरी मधुन केलेली दिसते.
7 मराठी साहित्य जागतिक महायुध्दाचे दुष्परिणाम, महागाई, मानवी मूल्यांचा –हास, जागतिक महायुध्दाने निर्माण केलेले विविध प्रश्न अधोरेखित करण्यास उपयुक्त ठरलेले आहे.

### *संदर्भ*

1.डॉ.कसबे रावसाहेब, चळवळ आणि मराठी साहित्य,(संपा.सातपुते ),शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर,प्र.आ.2009,पृ. 21
2. ॲथनी स्मिथ ,तत्रैव पृ. 21
3. अदावंत म. ना., प्रदक्षिणा (खंड पहिला), कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे,सहावी.आ.1976, पृ. 151
4. जोग रा.श्री.,तत्रैव, पृ. 45
5. डॉ. महाजन वंदना, मराठी कादंबरीतील स्त्रीवाद, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,प्र.आ.2010, पृ. 103
6. डॉ. क्षीरे वसंत, सामाजिक शास्त्रे आणि साहित्यःअंतःसंबंध, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ.1995, पृ. 165



***रावसाहेब दशरथ ननावरे***
ॲड्.एम.एन.देशमुख महाविद्यालय, राजूर, ता.अकोले, जि.अहमदनगर

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net